


# दुसरी मेट्रो गाडी मुंबईत दाखल

**प्रतिनिधी/ मुंबई**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३' मार्गिकेसाठी एकूण ३१ मेट्रो गाड्यांची आवश्यकता आहे. असे असतानाच यापैकी दुसरी मेट्रो गाडी गुरुवार २९ डिसेंबर रोजी मध्यरात्री मुंबईत दाखल झाली आहे. आठ डब्यांची ही गाडी आंध्र प्रदेशातील श्रीसिटी येथून मुंबईतील सारीपुत नगर येथील तात्पुरत्या कारशेडमध्ये दाखल झाली आहे. येथे आठही डबे उतरविण्यात आले असून, आता या डब्यांची जोडणी करून गाडीच्या चाचणीस सुरुवात करण्यात येणार आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) ३३.५ किमी लांबीच्या 'मेट्रो ३' मार्गिकेचे काम सुरू आहे. दोन टप्पात हे काम करण्यात येत असून, यापैकी बीकेसी ते सीप्झ हा टप्पा डिसेंबर २०२३ मध्ये सुरू करण्याचे एमएमआरसीचे नियोजन आहे. त्यामुळेच या टप्प्याच्या आणि आरे कारशेडच्या कामाला वेग देण्यात आला आहे, तर दुसरीकडे या टप्प्यासाठी लागणाऱ्या मेट्रो गाड्या आंध्र प्रदेशातून मुंबईत आणून त्यांची चाचणी घेण्याच्या कामालाही प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळेच ऑगस्टमध्ये पहिली गाडी मुंबईत आणून तिची चाचणी सुरू केली आहे, तर आता दुसरी गाडीही मुंबईत आणण्यात आली आहे.